# गोंदिया जिल्ह्यातील ३३ रेती घाटांची पर्यावरण विषयक लोकसुनावणीचे इतिवृत्त दि.०९/१२/२०२२. वेळ दु. २.०० वा.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हा गोंदिया, यांच्या गोंदिया जिल्हयातील किन्ही (४.५० हेक्टर), महालगांव – १ (४.०० हेक्टर), महालगांव – २ (३.०० हेक्टर), मुरदाडा (सायटोला) (३.३० हेक्टर), मुरदाडा (पार्वतीघाट) (३.८५ हेक्टर), डांगुर्ली (४.५० हेक्टर), देवरी (२.२४ हेक्टर), तेंढवा (१.१७ हेक्टर), बनाथर (२.२४ हेक्टर), सातोना (गावघाट) (१.०४ हेक्टर), बिरसोला (३.५० हेक्टर), जिरुटोला (१.२८ हेक्टर), पुजारीटोला (कासा) (४.५० हेक्टर), अर्जुनी (१.१२ हेक्टर), बोंडराणी (३.०० हेक्टर), सावरा (४.०० हेक्टर), चांदोरी बुज (२.७० हेक्टर), बिरोली (४.५० हेक्टर), मांडवी (४.५५ हेक्टर), कवलेवाडा (१.२८ हेक्टर), घाटकुरोडा – १ (४.५० हेक्टर), घाटकुरोडा- २ (४.५० हेक्टर), घाटटेमणी (डोगाघाट) (१.०५ हेक्टर), मानेकसा (१.२० हेक्टर), सावंगी -१ (१.०८ हेक्टर), सांवगी -२ (१.१४ हेक्टर), पळसगांव (राका) (१.१० हेक्टर), सौंदड (१.४४ हेक्टर), पिपरी (१.२० हेक्टर), कोदामेडी (१.०१ हेक्टर), घाटबोरी तेली (१.१२ हेक्टर), सिंघमऱ्हान (१.०५ हेक्टर), वडेगांव (बंध्या) (१.०४ हेक्टर), या प्रस्तावित ३३ रेतीघाटांची पर्यावरण विषयक लोकसुनावणी दि. ०९.१२.२०२२ रोजी नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे संपन्न झाली.

सदर पर्यावरण विषयक लोकसुनाणी श्रीमती. नयना गुंडे जिल्हादंडाधिकारी तथा जिलहाधिकारी गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री. अशोक करे प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नागपूर, पर्यावरण विषयक लोकसुनावणी समितीचे सदस्य तसेच श्री. राजेश खवले, अतिरिक्त जिल्हाधिकारी गोंदिया हे लोकसुनावणीस उपस्थित होते. श्रीमती. हेमा देशपांडे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भंडारा यांनी लोकसुवणीच्या समन्वयक म्हणून कामकाज पाहिले. लोकसुनावणीदरम्यान ५६ जण उपस्थित होते. (सहपत्र-१ उपस्थितांची यादी.)

जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांनी दिनांक. २७.१०.२०२२ च्या पत्राव्दारे गोंदिया जिल्ह्यातील ३३ रेती घाटांची लोकसुनावणी घेण्याबाबत प्रस्ताव म.प्र.नि. मंडळाकडे सादर केला, या प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण व हवामन बदल विभाग मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचेकडून पर्यावरण विषयक मंजुरी आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाने लोकसुनावणी प्रक्रिया आयोजित करण्याचे निर्देश दिले.

१४ सप्टें २००६ च्या EIA अधिसूचनेनुसार, ०१.१२.२००९ मध्ये सुधारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, स्थळ, तारीख आणि वेळ जिल्हा दंडाधिकारी, गोंदिया यांच्या मंजुरीने अंतिम करण्यात आली. म. प्र. नि. मंडळाच्या मुख्यालयाने दि. २३.११.२०२२ रोजी कार्यालयीन आदेश क्र.E९२ OF २०२२. (प्रत सोबत-१)

दि. ०९ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी २.०० वाजता जिल्हा दंडाधिकारी, गोंदिया यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया येथे पर्यावरण विषयक लोकसुनावणी घेण्याबाबत कार्यालयीन आदेश जारी केले. (प्रत सोबत)

सदर पर्यावरणविषयक लोकसुनावणीची जाहिरात इंग्रजी दैनिक " द हितवाद" आणि मराठी दैनिक "नवराष्ट्र" मध्ये दिनांक ०८ नोव्हेंबर २०२२ रोजी रोजी प्रकाशित करण्यात आली. (प्रत सोबत-[illegible])

ज्यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाचा मसुदा कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत प्रतीसह संबंधितांना तीस दिवसांच्या कालावधीत खालील कार्यालयात अभ्यासण्याकरिता ठेण्वण्यात आला होता.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.
२. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
३. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-
४. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
५. प्रादेशिक कार्यालय (पश्चिम मध्य विभाग), पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, तळमजला, पूर्व विभाग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाइन्स, नागपूर -४४०००१.
६. जिल्हा खनिकर्म कार्यालय, गोंदिया.
७. जिल्हा परिषद, गोंदिया.
८. जिल्ह्यातील संबंधीत उप-विभागीय अधिकारी यांचे कार्यालय.
९. जिल्ह्यातील संबंधीत तहसिलदार यांचे कार्यालय
१०. संबंधीत ग्रामपंचायत कार्यालये
११. मंडळाची वेबसाइट www.mpcb.gov.in

**लोकसुनावणीपूर्वी तसेच लोकसुनावणीदरम्यान कोणतेही टीका-टिपणी आक्षेप, निवेदन, तक्रारी प्राप्त झालेले नाही.**

मा. अध्यक्षांच्या परवानगीने दुपारी २.०० वाजता लोकसुनावणीचे कामकाज सुरू झाले. समन्वयक श्रीमती. हेमा देशपांडे, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी मा. लोकसुनावणी समितीच्या अध्यक्षा श्रीमती. नयना गुंडे जिल्हादंडाधिकारी गोंदिया, श्री. अ. मा. करे प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि. मंडळ नागपूर, सदस्य लोकसुनावणी समिती तसेच उपस्थितांचे स्वागत केले.

प्रास्ताविकात त्यांनी लोकसुनावणीची कार्यपध्दती विषयी माहिती दिली आणि स्पष्ट केले की, लोकसुनावणी समितीली शिफारस करण्याचा किंवा प्रकल्प मंजूर करण्याचा अधिकार नाही. पर्यावरण विषयक लोकसुनावणीदरम्यान झोलेल्या कामकाजाचे इतिवृत्त , व्हिडिओ रेकॉर्डिंग, प्राप्त लेखी आक्षेप, निवेदने, सूचना, इत्यादीसह पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पर्यावरण व हवामान बदल विभाग मंत्रालयाकडे सादर केली जाईल.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने समन्वय उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांना प्रस्तावित रेती घाट प्रकल्पांचे विस्तृत सादरीकरण देण्यासाठी आमंत्रित केले.

खनिकर्म अधिकारी गोंदिया यांनी ३३ रेतीघाटांच्या प्रस्तावाची पार्श्वभूमी दिली. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र वाळू धोरण ०३.०९.२०१९ नुसार, जिल्हा खनिकर्म अधिकारी यांना प्रस्तावित वाळू घाटांच्या पर्यावरण मंजुरी नंतर लिलाव करुन नंतर यशस्वी बोलीदाकडे हस्तांतरित केली जाईल. २०२२ दरम्यान एकूण ६३ रेतीघाटांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यातील ३३ घाट तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखालील तालुकास्तरीय तांत्रिक समिती ज्यामध्ये अभियंता पाटबंधारे विभाग, भूविज्ञान आणि खाण संचालनालयाव्दारे नियुक्त कनिष्ठ भूवैज्ञानिक, G.S.DA मधील कनिष्ठ भूवैज्ञानिक, गोंदिया व प्रतिनिधी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सदस्य समितने मंजुरीसाठी अंतिम केले आहेत.
नदीच्या पात्रातील नियुक्त केलेल्या क्षेत्रातून वाळू उत्खननासाठी मॅन्युअल पध्दतीचा अवलंब केला जाईल.
जिल्हा खनिकर्म अधिकारी गोंदिया यांनी रेती घाट प्रकल्पांसाठी तांत्रिक सल्लागार मेसर्स महाबळ इन्हॉयरो लि. च्या प्रतिनिधीला विस्तृत मराठीत सादरीकरण करण्याकरिता आमंत्रित केले.

तांत्रिक सल्लागाराच्या प्रतिनिधीने आपल्या सादरीकरण्यादरम्यान, प्रस्तावित प्रकल्पाची सध्याची पर्यावरण स्थिती, वाळू उत्खननासाठी अवलंबलेली पध्दत, प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरणावर होणारा परिणाम आणि प्रत्येक रेतीघाटासाठी पर्यावरण व्यवस्थापन आराखड्याबाबत विस्तृत माहिती दिली.

सुनावणीच्या समन्वयक श्रीमती हेमा देशपांडे यांनी उपस्थितांना प्रकल्पाबाबत विस्तृत माहिती सादरीकरण केल्यानंतर संबंधितांना प्रकल्पाबाबत त्यांचे मत, आक्षेप, टीका-टिप्पणी, हरकती व सूचना इत्यादी मांडण्यास मा. अध्यक्षांच्या परवानगीने आमंत्रित केले. मुद्दा उपस्थित करणाऱ्यांने सर्वप्रथम स्व:ताचे नाव, गाव व हुद्दा सांगावे असे सूचित केले.

**कामकाजादरम्यान चर्चित मुद्दे खालीलप्रमाणे आहे.**

**१) ए. सी. बिसेन. ग्रामपंचायत महालगांव.**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | वाळूची वाहतुक गावातून होत असल्यामुळे गावकऱ्यांना अडचण निर्माण होत आहे.<br>वाळुची वाहतूक गावाच्या बाहेरुन झाली पाहिजे. पर्यायी मार्गाचा वापर करण्यात यावा. | महालगांव येथील रेतीघाटांवर रेतीची वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या येण्या-जाण्याकरिता गावाबाहेरील रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यानुसार वाहतूक होईल. व याबाबत दक्षता घेण्यात येईल. |

**२) श्री. मो. खरे उप-सरपंच कांसा पुजारी टोला**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | वाळू वाहतुकीमुळे रस्ते खराब झाले आहे ते दुरूस्त होणे आवश्यक आहे | वाळू/ रेती धोरणाऱ्या तरतुदीनुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत सदर क्षेत्र खाण बाधित असल्याने संबंधित ग्रामप्रचायतीचे रस्ते दुरूस्ती, बांधकामबाबत निधी उपलब्ध करण्याची उचित कार्यवाही करण्यात येईल. |

३) **श्री. आर. बी. पटले. ग्रामसेवक, पळसगांव, सडक अर्जुनी**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | आमच्या ग्रामपंचायतीपासून नदीपर्यंत जो रस्ता आहे तो बनविण्यात यावा नंतर रेतीघाटाचा लिलाव व्हावा.तसेच झाडे लावण्यात यावे. | सदर रेतीघाटावरुन ये-जा करण्याकरिता गावाबाहेरुन रस्ता प्रस्तावित असून त्यानुसार वाहूक होईल. निधी अंतर्गत सदर क्षेत्र खाण बाधित असल्याने संबंधित ग्रामप्रचायतीचे रस्ते दुरूस्ती, बांधकामबाबत निधी उपलब्ध करण्याची उचित कार्यवाही करण्यात येईल. तसेच रेतीघाटांच्या क्षेत्रामध्ये वृक्षारोपण करण्याचे नियोजन रेतीघाट प्रस्तावात करण्यात आलेले आहे. |

४) **श्री. एच.पी. गजभिये, डांगुर्ली किंनी**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | सुरूवातीला आमचा या लिलावाला विरोध होता. वाहतूक गावातून होते. दरवर्षी आम्ही ठरावामध्ये रत्यांची अट घालतो. गावात शाळा आहे, वाहतूक ही गावाच्या बाहेरुन व्हावी. रत्यांची कामे अजून झालेली नाही. | डांगुर्ली येथील रेतीघाटांवर रेतीची वाहूक करणाऱ्या वाहनांच्या येण्या-जाण्याकरिता गावाबाहेरील रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यानुसारच वाहतूक होईल व याबाबत दक्षता घेण्यात येईल. |

५) **श्री. जगदीश नागलवाडे, ग्रामविकास अधिकारी, सौंधळ**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | मागच्या वर्षी लिलाव प्रक्रिया पूर्ण त्यामध्ये वृक्ष लागवड झालीच नाही. लिलावामध्ये जो मार्ग ठरलेला असतो त्यामार्गाने वाळुची वाहतूक होत नाही. चोरट्या रस्त्यांनी वाळुची वाहतूक केली जाते. जो खनिज विकास अनुदान मिळायला पाहिजे तो अजूनपर्यंत मिळालेला नाही. | सौंधळ येथील रेतीघाटांवर रेतीची वाहूक करणाऱ्या वाहनांच्या येण्या-जाण्याकरिता गावाबाहेरील रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. त्यानुसारच वाहतूक होईल व याबाबत दक्षता घेण्यात येईल. तसेच रेतीघाटांच्या क्षेत्रामध्ये वृक्षारोपण करण्याचे नियोजन रेतीघाट प्रस्तावात करण्यात आलेले आहे. |

६) **श्री. एच. एस. वरठे, मुरदाडा, गोंदिया.**

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | आमच्या ग्रामसभेमध्ये भरपूर अडचणी आल्या आहेत. गावकऱ्यांची अशी मागणी आहे की, खनिज विकास अनुदान जो पर्यंत प्राप्त होत नाही, रस्त्यांची दुरूस्ती होणार नाही तोपर्यंत आम्ही ठरावाला मंजुरी देणार नाही. | वाळू/ रेती धोरणाऱ्या तरतुदीनुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत सदर क्षेत्र खाण बाधित असल्याने संबंधित ग्रामप्रचायतीचे रस्ते दुरूस्ती, बांधकामबाबत निधी उपलब्ध करण्याची उचित कार्यवाही करण्यात येईल. |

७) श्री. मोहपत खरे, कारवा.

| अनु. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक / म.प्र.नि. मंडळ यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| | यापूर्वी पाच वर्षांपासून लिलाव होत आहे परंतु खनिज विकास निधीचा अनुदान मिळत नाही त्यामुळे आमचे नुकसान होत आहे. शेतकरी भाजीपाल्याचे उत्पन्न घेणारे आहे.<br>धुळीमुळे भाजीपाल्याचे नुकसान होते त्यामुळे ते बाजारात विकले जात नाही. पर्यायी रस्त्यांची व्यवस्था केली पाहिजे. वाळु चोरीचे प्रमाणही वाढले आहेत. | बिरसोला येथील रेतीघाटावरील रेती वाहतूक होणाऱ्या वाहनामुळे धूळ उडू नये म्हणून त्याकरिता पाण्याचे शिंपन (Sprinkling) करण्याचे नियोजन आहे. वाळू/ रेती धोरणाऱ्या तरतुदीनुसार जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी अंतर्गत सदर क्षेत्र खाण बाधित असल्याने संबंधित ग्रामप्रचायतीचे रस्ते दुरूस्ती, बांधकामबाबत निधी उपलब्ध करण्याची उचित कार्यवाही करण्यात येईल. |

श्रीमती. हेमा देशापांडे उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भंडारा यांनी सर्व सहभागी नागरिकांना आव्हान केले की, अजून कोणास आले मत मांडावयाचे असल्यास ते मांडू शकतात. त्यानंतर, कुणीही आपले म्हणणे मांडावयास पुढे आले नाही.

मा. जिल्हाअधिकारी, गोंदिया यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांना असे कळविले की, नागरिकांनी मांडलेले अभिप्राय व सूचना याची दखल घेण्यात येईल. तसेच, प्रस्तावकांनी दिलेल्या माहितीप्रमाणे, रेतीघाटावरून ये-जा करणाऱ्या गाड्यांची रस्त्यावरील वाहतुकीबाबत विशेष दक्षता घेण्यात यावी. तसेच, उत्खनन परिसरात / क्षेत्रामध्ये विविध प्रकारची झाले लावणे अनिवार्य असून नियमानुसार त्याची लागवड करण्यात यावी, असे संबंधित अधिकाऱ्यांना / विभागांना निर्देश दिलेत. तसेच, सुनावणीमध्ये उपस्थित लोकांना असेही सूचित

केले की, त्यांनी आपली मागणी संबंधित तहसिलदार यांचेकडेही करावी. याशिवाय, फक्त रस्ते नव्हे तर इतर सोयी-सुविधा उपलब्ध करण्याचे प्रयत्न करु, असेही मा. जिल्हाधिकारी यांनी सर्वांना आश्वासन दिल.

त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी करण्यात आली व गोंदिया जिल्ह्यातील ३३ रेती घाटाबाबत उपस्थित जनसमुदायांनी शांतपणे आपली निवेदने मांडली व उपस्थित केलेल्या मुद्यांची तंतोतंत इतिवृत्तामध्ये नोंद घेण्यात आली, असे कळविले. लोकसुनावणीचे समितीचे अध्यक्ष्यांनी लोकसुनावणीचा समारोप केला. श्रीमती. हेमा देशपांडे, समन्वयक यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले तसेच, प्रकल्प प्रस्तावकांचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मांडले. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ही जाहीर लोकसुनावणी संपल्याचे जाहीर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| ( नयना गुंडे भाप्रसे ) | (अशोक करे ) | (हेमा देशपांडे ) |
| जिल्हादंडाधिकारी गोंदिया व | प्रादेशिक अधिकारी, | उप-प्रादेशिक अधिकारी |
| अध्यक्षा लोकसुनावणी समिती | म.प्र.नि. मंडळ, नागपूर व | म.प्र.नि. मंडळ, भंडारा व |
| | सदस्य लोकसुनावणी समिती. | समन्वयक लोकसुनावणी समिती |